RNI NO. MAHMAR/2020/84035

कायदेविषयक मार्गदर्शन मोफत
संपर्क अँड . सुशीला
मो नं 8766507294

BAHUJAN SAURABHA

# बहुजन सौरभ

**दि. 7 मार्च 2026**



1925- न्यायालयाच्या स्वातंत्र्यांचा प्रश्न बाबासाहेबांनी उपस्थित केला.

1936- कामठी येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर मैदानावर अस्पृश्याची जाहीर सभा.

संकलन प्रा. यशवंत दुपटे

शनिवार, ०७ मार्च २०२६ | वर्ष : ६ | अंक : ६८ | दैनिक | किंमत : ₹ ५/-
Saturday, 07 March 2026 | Year : 6 | Issue : 68 | Daily | Rate: Rs. 5/-

## महत्त्वाच्या बातम्या

### मी भाजप-निवडणूक आयोगाचे षड्यंत्र उघड करेन : ममता बॅनर्जी

**कोलकाता :** पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी शुक्रवारी राज्य विधानसभा निवडणुकीच्या अगदी आधी मतदार यादीतून नावे अनियंत्रितपणे वगळल्याच्या कथित विरोधात धरणे आंदोलन सुरू केले, ज्यामुळे तृणमूल काँग्रेस (टीएमसी) आणि निवडणूक आयोग यांच्यातील संघर्ष वाढला आहे. कोलकाता येथील एस्प्लेनेड मेट्रो स्टेशनवर धरणे सुरू करतांना, बॅनर्जी यांनी भाजप आणि निवडणूक आयोगावर बंगाली मतदारांना मतदानाचा हक्क हिरावून घेण्याचा कट रचल्याचा आरोप केला आणि त्यांना उघड करण्याचे वचन दिले. 'मी बंगाली मतदारांना मतदानाचा हक्क हिरावून घेण्याच्या भाजप-निवडणूक आयोगाच्या कटाचा पर्दाफाश करेन,' असे तृणमूल काँग्रेसच्या प्रमुखांनी निषेधाच्या सुरुवातीला सांगितले.

### 'एसबीएल' कंपनी स्फोटात आणखी एका महिला कामगाराचा मृत्यू

**नागपूर :** काटोल तालुक्यातील राऊळगाव येथील 'एसबीएल' कंपनीत झालेल्या भीषण स्फोटातील जखमींवर उपचार सुरू असताना, आज शुक्रवारी आणखी एका महिला कामगाराचा मृत्यू झाला. काळजाचा थरकाप उडवणाऱ्या दुर्घटनेतील एकूण मृतांची संख्या आता 20 वर पोहोचली आहे. सध्या 16 रुग्ण उपचार घेत असून यातील दोन रुग्ण व्हेंटिलेटरवर आहेत. 1 मार्च रोजी झालेल्या भीषण स्फोटानंतरनागपूरच्या ऑरेंज सिटी हॉस्पिटल अँड रिसर्च इन्स्टिट्यूट येथे 18 जखमींना दाखल करण्यात आले होते. त्यापैकी दुर्गा केशव सेवतकर (42) यांचा आज, 6 मार्च रोजी सकाळी 8:13 वाजता उपचारादरम्यान मृत्यू झाला. दुर्गा या 60 टक्के भाजल्या होत्या. यापूर्वी 2 मार्च रोजी रंजना उत्तम घागरे (34) यांचा मृत्यू झाला होता, तर एक रुग्ण 'ब्रॉट डेड' आणला गेला होता.

### अखेरची गोळी आणि शेवटचा सैनिक असेपर्यंत आम्ही लढणार : इराण

**नवी दिल्ली :** अमेरिका आणि इस्त्राइलने इराणविरोधात सुरू केलेल्या संघर्षाला आता आठवडा उलटत आला आहे. या काळात दोन्ही देशांनी इराणवर केलेल्या भीषण बॉम्बवर्षावामध्ये इराणची प्रचंड हानी झाली आहे. एवढंच नाही तर इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्लाह अली खामेनेई यांचाही अमेरिका आणि इस्त्राइलने केलेल्या हल्ल्यात मृत्यू झाला आहे. मात्र त्यानंतरही इराणने माघार न घेता संघर्ष सुरू ठेवला आहे. तसेच आखाती देशांमधील अमेरिकेच्या तळांसह इस्त्राइलला वारंवार लक्ष्य केले आहे. या संघर्षादरम्यान, आता इराणने थेट अमेरिकेला आव्हान देत अखेरची गोळी शिल्लक असेपर्यंत आणि शेवटचा सैनिक जिवंत असेपर्यंत लढण्याची घोषणा केली आहे. इराणचे उपपरराष्ट्रमंत्री सईद खतीबजादेह यांनी नवी दिल्लीमध्ये प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना मोठे विधान केले आहे. अमेरिका आणि इस्त्राइलकडून होत असलेल्या हल्ल्यांविरोधात वीरतापूर्वक राष्ट्रवादी बचाव करण्याशिवाय आमच्याकडे कोणताही पर्याय शिल्लक राहिलेला नाही. आमचा देश शेवटची गोळी आणि शेवटचा सैनिक जिवंत असेपर्यंत संघर्ष करेल, असेही खतीबजादेह यांनी सांगितले.

### खरेच देशातील पेट्रोल-डिझेल संपत आहे का ?

**नवी दिल्ली :** मध्यपूर्वेत वाढलेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर भारतात पेट्रोल आणि डिझेलची टंचाई निर्माण होणार असल्याच्या अफवा सोशल मीडियावर वेगाने पसरत आहेत. या अफवांमुळे काही शहरांमध्ये पेट्रोल पंपांवर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्याचे चित्र पाहायला मिळाले. मात्र देशातील प्रमुख तेल कंपन्यांनी या सर्व बातम्या पूर्णपणे निराधार असल्याचे स्पष्ट केले आहे. HPCL आणि BPCL या दोन्ही कंपन्यांनी स्पष्ट केले की, देशात इंधनाचा साठा मुबलक आहे आणि पुरवठा साखळी पूर्णपणे सुरळीत सुरू आहे. कंपन्यांच्या म्हणण्यानुसार, मध्यपूर्वेतील तणाव किंवा आंतरराष्ट्रीय बाजारातील चढउतार याबाबतच्या बातम्या अनेकदा चुकीच्या पद्धतीने पसरवल्या जातात. त्यामुळे लोकांमध्ये अनावश्यक भीती निर्माण होते.

# शेवटचा क्रांतिकारी जय भीम प्रा. रणजीत मेश्राम सर



**नागपूर :** प्रा. रणजीत मेश्राम यांच्या पार्थिवावर आज वैशाली घाट येथे अंत्यसंस्कार करण्यात आला. सकाळी 8 ते 11 च्या दरम्यान त्यांचे पार्थिव इंदोरा बौद्ध विहाराजवळील त्यांच्या जुन्या घराच्या प्रांगणात ठेवण्यात आले. यावेळी वैशाली घाटावर जेष्ठ रिपब्लिकन नेते प्रा. अशोक गोडघाटे यांच्या अध्यक्षतेखाली शोकसभा घेण्यात आली.







याप्रसंगी भदंत आर्य नागार्जुन सुरई ससाई, डॉ. मिलिंद माने, दादाकांत धनविजय, विलास गजघाटे, भूपेंद्र गणवीर, जावेद पाशा, ज्ञानेश्वर रक्षक, भन्ते नागदिपांकर, प्रा. जानराव गजभीये, देशक खोब्रागडे, भूपेश थुलकर इत्यादी मान्यवरांनी आपल्या शोक संवेदना व्यक्त केल्यात. शोकसभेचे संचालन राजन वाघमारे आणि अशोक कोल्हटकर यांनी केले. यावेळी लोक मोठ्या संख्येने वैशाली घाटावर उपस्थित होते. तसेच या प्रसंगी, प्रल्हाद दुर्गे, अरविंद गजभिये, कुणाल राऊत, अशोक सरस्वती, मिलिंद गाणार, प्रा. जावेद पाशा, दादकांत धनविजय, राहुल वानखेडे, देशक गिरीश खोब्रागडे, माणिकराव तुरे, प्रा. पवन गजभिये, मुरली मेश्राम, सुधीर भगत, पत्रकार आनंद डेकाटे, केवल जीवनतारे, योगेश चिवंडे, वर्षा शामकुळे, मिलींद कीर्ती, प्रकाश कुंभे, राहुल मुन, प्रा. सरोज आगलावे, महेंद्र गायकवाड, मिलिंद मेश्राम, नरेश महाजन, डॉ. अनिल हिरेखन, सरोज मेश्राम, उमेश बोरकर, संजय फुलझेले, भीमराव वैद्य, उषा बौद्ध, प्राचार्य प्रज्ञा बागडे, प्रा. प्रदीप बोरकर, दिनेश अंडर शहारे, सुमेधा नितीन राऊत, सुलेखा कुंभारे, तक्षशिला वागधरे, डॉ. मच्छिंद्र चोरमारे, प्रकाशनाथ पाटणकर, बाळू घरडे, राजन वाघमारे, पत्रकार संजय लोखंडे, नरेश वाहने, उत्तम शेवडे, प्रफुल गुळधे पाटील, बंडोपंत टेंभूर्णे, छाया खोब्रागडे, पुष्पा बौद्ध, उज्वला गणविर, वनमाला उके यावेळी समता सैनिक दलांनी मानवंदना दिली.

### शोकसंवेदना

'प्रा.रणजीत मेश्राम हे एक ज्येष्ठ पत्रकार वक्ते आणि विचारवंत होते. त्यांच्या निधनामुळे आंबेडकर समाजाची फार मोठी हानी झाली आहे. रिपब्लिकन विद्यार्थी फेडरेशनपासून त्यांच्या सामाजिक कार्याला सुरुवात झाली. रिपब्लिकन नेते राजाभाऊ खोब्रागडे यांच्या राजकीय चळवळीत त्यांचा विशेष सहभाग राहिला.' अशा शब्दात प्रा. अशोक गोडघाटे यांनी आपली शोकसंवेदना व्यक्त केली.

**- प्रा. अशोक गोडघाटे**

साहित्यिक आणि विचारवंत डॉ. प्रदीप आगलावे यांनी म्हणाले की, ' प्रा. मेश्राम हे एक सामजिक जाणिवेचे आणि आंबेडकरी विचारांचे एक प्रखर वक्ते आणि नेते होते. त्यांच्या निधनामुळे आंबेडकरी चळवळीची फार मोठी हानी झाली आहे. ते वक्तृत्वकलीचे धनी होते. त्यांच्या बोलण्यात माधुर्य होते. त्यांची भाषा ही श्रोत्यांना आकर्षित करून घ्यायची. अशा प्रकारचा एक आंबेडकरी विचारांचा सच्चा नेता आमच्यातून निघून गेला, याचे आम्हाला फार दु:ख आहे.'

**- डॉ. प्रदीप आगलावे**

आंबेडकरी विचारवंत मा. ताराचंद्र खांडेकर यांनी प्रा. मेश्राम यांच्या कार्यांचा ओझरचा आढावा घेतला. अस्मितादर्श साहित्य संमेलन हे नागपूर मध्ये तीन वेळा झाले. त्यापैकी एस. सी . एस. गर्ल्स हायस्कूलमध्ये झालेल्या संमेलनाची पूर्ण जबाबदारी प्रा. मेश्राम यांच्या खांद्यावर होती. त्यामुळे ते संमेलन यशस्वी होऊ शकले. त्यांच्या निधनामुळे आंबेडकरी समाजाची फार मोठी हानी झाली.'

**- ताराचंद्र खांडेकर**

ई.मो नानावरे यांनी सांगितले की, प्रा. मेश्राम हे एक कर्तबगार अशा प्रकारचं व्यक्तिमत्त्व होतं. त्यांचा आंबेडकरी चळवळीत अतिशय महत्त्वाचा सहभाग राहिला. त्यांच्या निधनामुळे आम्ही पोरके झालो आहे.

**- ई.मो. नारनवरे**

प्रा. रणजीत मेश्राम यांचे बहुजन सौरभशी एक वेगळे नाते होते. बहुजन सौरभच्या सुरुवातीपासूनच ते बहुजान्न सौरभशी निगडीत होते. अनेकदा ते बहुजन सौरभला मार्गदर्शन करायचे. त्यांच्या निधनामुळे बहुजन एक मार्गदर्शक हरविला आहे. अशा शब्दात याप्रसंगी बहुजन सौरभच्या निवासी संपादिका संध्या राजूरकर यांनी आपल्या शोकसंवेदना व्यक्त केली.

**- प्रा. संध्या राजूरकर**

## नागरी सेवा परीक्षा 2025 चा अंतिम निकाल जाहीर

**नवी दिल्ली :** PSC CSE 2025 चा अंतिम निकाल PSC नागरी सेवा परीक्षा 2025 चा अंतिम निकाल जाहीर झाला आहे. राजस्थानमधील रावतभाटा येथील अनुज अग्निहोत्रीने या प्रतिष्ठित परीक्षेत प्रथम क्रमांक पटकावला, तर तामिळनाडूतील राजेश्वरी सुवे एम दुसऱ्या क्रमांकावर आणि पंचकुला येथील एकांश धुल्ल तिसऱ्या क्रमांकावर आली. यावर्षी एकूण 958 उमेदवारांची निवड झाली. राजस्थानमधील एका छोट्या शहरातील रहिवासी असलेल्या अनुज अग्निहोत्रीने आपल्या कठोर परिश्रम आणि समर्पणाच्या जोरावर नागरी सेवा तयारीत उल्लेखनीय यश मिळवले आहे. अनुजने 2025 च्या नागरी सेवा परीक्षेत अव्वल स्थान पटकावले. तो राजस्थानातील रावतभाटा येथील आहे, जिथे त्याने आपले शालेय शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर त्याने वैद्यकीय शिक्षण घेतले आणि जोधपूर येथील एम्समधून एमबीबीएस पदवी मिळवली. दुसरा क्रमांक मिळवणारी राजेश्वरी सुवे एम तिसरा क्रमांक एकांश धुल्ल पटकावला. राघव झुनझुनवाला चौथा क्रमांक पटकावला. ईशान भटनागरला पाचवा क्रमांक मिळाला. सुवे एम आणि रँक 3 आकांश धुललायांना मिळाला. जिनिया अरोरा हिने सहावा ऋमांक पटकावला. 7 वा क्रमांक मिळवणारा ए. आर. राजा मोहिदीन कोण आहे? धार जिल्ह्यातील कुक्षी विधानसभा मतदारसंघातील बाग गावातील रहिवासी पक्षल जैन आठवा क्रमांक मिळवला आहे. शामलीच्या कांधला येथील बडा बाजार येथील रहिवासी आस्था जैन हिने नववा क्रमांक पटकावला. बिहारमधील वैशाली जिल्ह्यातील बिदुपूर दिलावरपूर पुर्वी येथील रहिवासी उज्वल प्रियांकने 10 वा क्रमांक मिळविला.




## राजकारण आणि आंतरराष्ट्रीय संबंध अंधाराकडे जात आहेत : राहुल गांधी



**कोल्लम :** काँग्रेस खासदार आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी शुक्रवारी म्हटले की, सध्याच्या राजकीय परिस्थितीत, आंतरराष्ट्रीय संबंधांच्या बाबतीत प्रत्येकजण अंधाराकडे आणि ज्ञानापासून दूर जात आहे. ते म्हणाले की, राजकारण असो किंवा आंतरराष्ट्रीय संबंध, एकमेकांना समजून घेण्याचा कोणताही प्रयत्न केला जात नाही आणि मतभेदांना हिंसाचाराचा सामना करावा लागतो. सरकारवर मतभेद दडपल्याचा आरोप करत ते म्हणाले, 'आज आपण राजकारण आणि आंतरराष्ट्रीय संबंधांमध्ये पाहतो की प्रत्येकजण अंधाराकडे आणि ज्ञानापासून दूर जात आहे. समोरच्या व्यक्तीला समजून घेण्याचा कोणताही प्रयत्न केला जात नाही. ते फक्त बॉम्बस्फोट करतात आणि त्यांना मारतात.' *'आपल्या राजकारणातही अशीच परिस्थिती आहे. जर तुम्ही एखाद्याशी सहमत नसाल तर तुम्ही त्यांच्यावर हल्ला करता किंवा हिंसक बनता,'* असा आरोप त्यांनी केला. महात्मा गांधींच्या शिवगिरी मठाला भेट देण्याच्या 100 व्या वर्धापन दिनानिमित्त कोल्लम येथे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते, जिथे त्यांची श्री नारायण गुरु यांची भेट झाली.

## भारत रशियन तेल खरेदी करेल : डोनाल्ड ट्रम्प



**नवी दिल्ली :** अमेरिकेने भारतीय रिफायनरीजना रशियन तेल खरेदी करण्यासाठी तात्पुरती सूट दिल्यानंतर, काँग्रेसने त्याबद्दल प्रश्न उपस्थित केले. काँग्रेसने अमेरिकेच्या निर्णयावर मोदी सरकारवर निशाणा साधला. पक्षाने विचारले की हे अमेरिकन ब्लॅकमेलिंग किती काळ चालू राहील. काँग्रेसचे संपर्क प्रभारी सरचिटणीस जयराम रमेश यांनी 'एक्स' वरील एका काव्यात्मक पोस्टमध्ये म्हटले आहे की, ट्रम्पचा नवा खेळ, त्याने आपल्या दिल्लीतील मित्राला सांगितले की, तुम्ही पुतिनकडून तेल खरेदी करू शकता, हे अमेरिकन ब्लॅकमेलिंग किती काळ चालू राहील. काँग्रेसने मोदी सरकारवर जोरदार हल्लाबोल केला.

## भारताने खूप सावधगिरी बाळगली पाहिजे : राहुल गांधी



**इडुक्की (केरळ) :** काँग्रेस खासदार आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी शुक्रवारी केरळमधील कुट्टीकानम येथील मारियन कॉलेजच्या विद्यार्थ्यांशी संवाद साधला आणि आंतरराष्ट्रीय संबंधांमधील गुंतागुंत, कृत्रिम बुद्धिमत्तेमध्ये (एआय) भारताचे स्थान, उच्च शिक्षणावरील कथित वैचारिक हल्ले, माध्यमांचे शस्त्रीकरण आणि राजकारणाचे स्वरूप यासह अनेक महत्त्वाच्या मुद्द्यांवर आपले विचार मांडले. राहुल गांधी यांनी सध्याची आंतरराष्ट्रीय परिस्थिती चिंताजनक असल्याचे वर्णन केले. ते म्हणाले, 'जमिनीवर, हे अमेरिका, इस्त्रायल आणि इराणमधील युद्धासारखे दिसते, परंतु प्रत्यक्षात ते अमेरिका, चीन आणि रशियामधील संघर्ष आहे.' अमेरिका महासत्ता राहण्याचा प्रयत्न करत आहे, तर चीन हळूहळू त्याच्या जवळ येत आहे. पश्चिम आशिया हे ऊर्जा उत्पादनाचे केंद्र आहे. पश्चिम आशियावरील आपल्या अवलंबित्वामुळे भारताला थेट फटका बसेल. भारतात इंधन अधिक महाग होणार आहे. भारतातील आर्थिक विकास मंदावणार आहे. म्हणून, आपण याबद्दल खूप सावधगिरी बाळगली पाहिजे. असे संघर्ष वाढण्याची शक्यता आहे. भारताने हे समजून घेतले पाहिजे की आपण एका हिंसक आणि धोकादायक काळात प्रवेश करत आहोत. म्हणून, भारताचे धोरण स्पष्ट असले पाहिजे. म्हणून, भारताने त्याचे धोरण आणि या धोकादायक काळाला तोंड देण्याच्या पद्धती स्पष्ट केल्या पाहिजेत. चीन आपल्या सीमेवर आहे आणि अमेरिका आपला मित्र आहे.

## स्मृतीशेष चरणदास झिंगर देशपांडे

मृत्यू 7 मार्च 2001

यांच्या 25 व्या स्मृतिदिनानिमित्त विनम्र अभिवादन



: विनीत :

आयुष्यमान शशिकांत देशपांडे (मुलगा)
आयुष्यमती सुषमा देशपांडे (सून)
आयुष्यमान नाना मेश्राम (जावई)
आयुष्यमती शालिनी नाना मेश्राम (मुलगी )
आयुष्यमती विना बाबाराव मेश्राम (मुलगी)
स्पृहा देशपांडे, शितल मेश्राम (नातिन),
धीरज मेश्राम, कुणाल मेश्राम, श्रीकांत मेश्राम (नातू).




## व्यापार, MSME आणि पायाभूत विकासाला चालना

**मुंबई :** शुक्रवार दिनांक 6 मार्च 2026 रोजी, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सादर केलेला महाराष्ट्राचा अर्थसंकल्प हा राज्याच्या आर्थिक विकासासाठी महत्त्वाचा टप्पा ठरू शकतो. या अर्थसंकल्पात पायाभूत सुविधा, शेती, एमएसएमई क्षेत्र आणि रोजगारनिर्मिती यावर विशेष भर देण्यात आला आहे. जे राज्यातील व्यापारी व उद्योग समुदायासाठी सकारात्मक संख्येत देणारे आहे. महाराष्ट्र आजही भारताची सर्वात मोठी राज्य अर्थव्यवस्था आहे. राज्याची अर्थव्यवस्था सुमारे 49 - 51 लाख कोटी इतकी असून देशातील GDP मध्ये सुमारे 14 टक्के योगदान देते. तसेच राज्यात 2024 -25 मध्ये रुपये 1.64 लाख कोटी इतकी परकीय गुंतवणूक (FDI )आली असून ती देशातील एकूण गुंतूवणुकी पैकी सुमारे 39 टक्के आहे. व्यापार आणि उद्योग क्षेत्राच्या दृष्टीने पायाभूत सुविधांवरील भर हा अत्यंत महत्ताचा निर्णय आहे. मुंबईतील मेट्रो विस्तार कोस्टल रोड प्रकल्प आणि राज्यातील रस्ते व कनेक्टिव्हिटी सुधारण्यावर या अर्थसंकल्पात विशेष भर देण्यात आला आहे. या प्रकल्पामुळे वाहतूक सुलभ होऊन लॉजिस्टिक खर्च कमी होण्यास आणि व्यापार साखळी अधिक वेगवान होण्यास मदत होईल. शेतकरी आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला पण देण्यासाठी सरकारने 2 लाखापर्यंतची कर्जमाफी आणि वेळेवर परतफेड करण्यासाठी 50000 हजार प्रोत्साहन अशी महत्त्वाची घोषणा केली आहे. तसेच 7.5 HP पर्यंतच्या पंप धारक शेतकऱ्यांसाठी सुमारे 20 लाख कोटीच्या विजबिल सवलत कार्यक्रम जाहीर करण्यात आलेला आहे. ग्रामीण उत्पन्न वाढल्यास त्याचा थेट परिणाम स्थानिक बाजारपेठा किरकोळ व्यापार आणि लघु उद्योगावर होतो त्यामुळे हा निर्णय व्यापार क्षेत्रासाठी ही सकारात्मक आहे एम एस एम ई क्षेत्राच्या दृष्टीने महाराष्ट्र आदित देशातील अग्रगण्य राज्य आहे राज्य सरकारने व्यवसाय सुरूभक्त वाढविण्यासाठी मैत्री सिंगल विंडो प्रणाली द्वारे 200 पेक्षा अधिक परवानगी आणि सेवांचे डिजिटायझेशन केले आहे ज्यामुळे उद्योग सुरू करण्याची प्रक्रिया अधिक सुलभ झाली आहे तसेच सरकारकडून एम एस एम ई क्षेत्राला वित्तीय सहाय्य आणि व्यवसाय वाढीसाठी प्रोत्साहन देण्याचा भर या अर्थसंकल्पात दिसून येतो.

## काही अर्थ नाही, कर्जमाफी शेतकऱ्यांसाठी की बँकांसाठी ? शेतकरी नेत्यांची सरकारवर टीका

अर्थसंकल्प मांडत असताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जी शेतकरी कर्जमाफी जाहीर केली आहे, ती तकलादू आहे. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचा विश्वासघात करणारी आहे. ऑक्टोबर महिन्यात आम्ही आंदोलन केले होते, तेव्हा सह्याद्री अतिथीगृहात झालेल्या बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सात बारा कोरा करण्याचा पुनरुच्चार केला होता. पण प्रत्यक्षात कर्जमाफी जाहीर केली, त्याला काही अर्थ राहिलेला नाही, अशी टीका शेतकरी नेते राजू शेट्टी यांनी केली. विधिमंडळात राज्याचा अर्थसंकल्प सादर करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाकांक्षी अशा कर्जमाफीची घोषणा केली आहे. 30 सप्टेंबर 2025 पर्यंत पीक कर्ज थकीत असणाऱ्या शेतकऱ्यांना या योजनेचा थेट लाभ मिळणार असून, या योजनेचे नामकरण 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना' असे करण्यात आले आहे. ज्या शेतकऱ्यांचे पीक कर्ज 30 सप्टेंबर 2025 रोजी थकीत होते, अशा पात्र शेतकऱ्यांचे 2 लाख रुपयांपर्यंतचे कर्ज पूर्णपणे माफ करण्यात येणार आहे. जे शेतकरी आपल्या कर्जाचे हप्ते वेळेवर आणि नियमितपणे भरत आहेत, अशा प्रामाणिक कर्जदार शेतकऱ्यांना प्रोत्साहन म्हणून 50,000 रुपयांचे अनुदान देण्यात येणार आहे. यावरून राजू शेट्टी यांनी सरकारवर टीका केली.

दरम्यान, सरकारने केलेली ही कर्जमाफी बँकांसाठी आहे की शेतकऱ्यांसाठी आहे ? असा प्रश्न पडतो, अशी टीका त्यांनी केली. तसेच आजचा राज्य सरकारचा अर्थसंकल्प म्हणजे केवळ आकडेवारीची फेकाफेक होती. जसे गाजर केंद्र सरकारने दिले, तसे गाजर आता राज्य सरकारने आपल्याला दिले. सरसकट कर्जमाफीची घोषणा केली होती मात्र ही सरसकट कर्जमाफी देत नाही दोन लाखांपर्यंत फक्त कर्जमाफी देणार आहे. शेतकऱ्यांची दिशाभूल केली जात आहे, अशी टीका काँग्रेस नेत्या यशोमती ठाकूर यांनी केली

### कर्ज काढून फटाके वाजवणारा अर्थसंकल्प : उद्धव ठाकरे



शिवसेने (उद्धव ठाकरे) पक्षाचे प्रक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनीही भाष्य केले आहे. 'कर्ज काढून फटाके वाजवणार हा अर्थसंकल्प आहे. त्यातून मला नाही वाटत, राज्याचे काही हीत साधले जाईल,' अशी टीका उद्धव ठाकरे यांनी केली आहे. उद्धव ठाकरे म्हणाले, 'राज्याची आर्थिक परिस्थिती कशी आहे, हे सर्वांनाच माहीत आहे. कर्ज काढून फटाके वाजवणार हा अर्थसंकल्प आहे. त्यातून मला नाही वाटत राज्याचे काही हीत साधले जाईल. तसेच, खरो-खरच शेतकऱ्यांचे भले करायचे असेल, तर, पात्र-अपात्र, हा जो काही शाब्दिक खेळ केला आहे, तसा करू नये. अर्थसंकल्पात 2047 चा वारंवार उल्लेख झाला, तर आताची कर्जमुक्ती 2047 पर्यंत तरी पूर्ण करणार का ? तर मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट करावे की, 'या' तारखेपर्यंत आम्ही कर्जमुक्ती पूर्ण करू,' असे आव्हानही उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिले आहे.'

पी. व्ही. वैद्य इन्स्टिट्यूट ऑफ नॉलेज अँड एम्पॉवरमेंट, नाशिक

स्मृतिशेष नीता दिलीप मुन पुरस्कार वितरण समारंभ

शनिवार दि. ७ मार्च २०२६ * वेळ : सायंकाळी ५ वाजता

- अध्यक्ष -
ॲड. डॉ. सिद्धार्थ कांबळे
मुख्य संपादक,
दैनिक बहुजन सौरभ

- पुरस्कारार्थी -
प्रा. संध्या राजुरकर
निवासी संपादक, दैनिक बहुजन सौरभ, नागपूर
आयु. उषा बौद्ध
ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या, नागपूर



- प्रमुख उपस्थिती -
मा. दीपक निरंजन
सदस्य, संविधान फाउंडेशन
मा. राम सावंत
माजी अधिकारी, महापालिका पुणे

प्रायोजक - दिलीप मुन, निवृत्त बँक प्रबंधक, युको बँक

स्थळ : दैनिक बहुजन सौरभ कार्यालय अजनी पोलीस स्टेशन जवळ मेडिकल कॉलेज मागे नागपूर

“ जो प्रयत्न सोडत नाही, तोच आयुष्य जिंकतो... ”



# आंबेडकरी विचारांचा एक प्रवाह थांबला...

जेष्ठ पत्रकार आणि आंबेडकरी विचारवंत रणजीत मेश्राम 'दादा' यांचे निधन झाले यावर विश्वासच बसत नाही. ते अनेक दिवस आजारी होते, त्यांचा आजार गंभीर होता. तरी कां कुणास ठाऊक ते असे जातील, न बोलताच, असे वाटत नव्हते. मी त्यांना आधी त्यांच्या लेखनातून ओळखले. एक वेगळीच शैली होती. लहान वाक्य आणि विशाल शब्द, संथ पाण्याच्या प्रवाहासारखे अलगद वाहणारे विचार. कुठेही खळखळ नाही. ओघ कमी झालेला नाही. फार लांबलचक पाल्हाळ नाहीच. मोजकेच शब्द, आणि थांबले, तेव्हा ज्ञानाच्या एखाद्या अगाध समुद्रात नेऊन सोडल्या सारखे. ते नुसतेच सांगत नव्हते. ते शिकवायचे, डोक्यात विचार पेरायचे. मेंदूला चालना द्यायचे आणि नुसते लिहितच नव्हते, तर प्रसंगी इतरांसोबत रस्त्यावर उतरायचे देखील, संघर्ष करायला. त्यांना प्रत्यक्ष ऐकण्याची संधी खूप नंतर मिळाली आणि त्याही खूप नंतर त्यांच्याशी संवाद साधण्याची संधी मिळाली. चेहऱ्यावर सतत असलेले एक विशिष्ट स्मित त्यांच्या मृदू स्वभावाची ग्वाही देत असे. पत्रकारितेचे अभेद्य शस्त्र पाठीशी असतांना देखील कुठलाही बडेजाव नाही. कुणाशीही, अगदी अनोळखी माणसांशी देखील सहज संवाद साधणारे. तुम्ही कोण, बघितल्यासारखे वाटते असा कोणताही प्रश्नार्थक आविर्भाव न दाखवता, सहज आपुलकीने बोलणारे. अशी माणसे भेटणे नाही. त्यांच्या जाण्याने, आंबेडकरी विचारांचा एक प्रवाह थांबला, पण एकूणच भारतीय समाजात वैचारिक पोकळी निर्माण झाली हे नाकारता येणार नाही. स्मृतिशेष रणजीत मेश्राम 'दादांना' विनम्र आदरांजली.

**– हरिश्चंद्र सुखदेवे, नागपूर**



# आंबेडकरी विचारांची हानी

एका आठवड्यात एक दोन दिवसाच्या फरकाने डॉ. जनार्दन वाघमारे, कवी प्रसेनजीत ताकसांडे यांच्या दुःखद निधनाच्या वार्ता आल्या तर बुधवारला दुपारी नागपुरातील आंबेडकरी विचारांचे वक्ते प्रा. रणजीत मेश्राम यांच्या निधनाचे वृत्त आले. अतिशय दुःखद अशी ही बातमी आहे. कवी ताकसांडे आणि इतर कवी पँथर्सनी त्या काळात काव्याच्या माध्यमातून जी भूमिका मांडली त्यामुळे आज समाज अधिकाराची भाषा बोलण्याच्या स्थितीत आहे. तत्कालीन पँथर्सचे योगदान नाकारणे कृतघ्नपणा ठरेल. सामाजिक आणि दलित साहित्यिक कार्यक्रमातून प्रा. मेश्राम यांनी जी मांडणी केली ती नव्या पिढीला मार्गदर्शक अशी होती. त्यांच्या व्याख्यानात संदर्भ, तत्कालीन स्थितीतील डॉ. आंबेडकरांची भूमिका याचा सखोल आणि चिकित्सक अभ्यास असल्याने ऐकणे पर्वणी असायची. कार्यक्रम कोणत्याही आर्थिक स्थितीतील वंचित समुदायाचा असो त्यांनी नकार दिला नाही. सामान्य दलित कार्यकर्त्यांशी त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध होते. त्यांना ते प्रोत्साहित करीत असत. यामुळे आंबेडकरी विचारांची प्रखरपणे मांडणी करणारे व्यक्तिमत्व काळाच्या पडद्याआड गेले आहे. वयाच्या आणि निसर्ग नियमाने ज्या घटना घडायच्या त्या मानव म्हणून प्रत्येकाला लागू आहे. या व्यक्तीही याला अपवाद नाहीत. दलित, आंबेडकरी चळवळीचे भरून न येणारे नुकसान झाले आहे. या व्यक्तिमत्वाच्या कार्याच्या नोंदी कुणीही पुस्तक रूपाने संकलित केल्या नाहीत. त्यामुळे त्यांच्या योगदानाबाबत नव्या जेन झी पिढीली माहिती नाही. कवी ताकसांडे आणि प्रा. मेश्राम यांचे दुःखद निधन ही आंबेडकरी चळवळ आणि पुरोगामी चळवळीची हानी आहे. प्रा. रणजीत मेश्राम यांच्या रूपाने अभ्यासू आणि प्रखर वक्ता समाजाने गमावला आहे. दिवंगतांना विनम्र आदरांजली.

**– अनिरुद्ध कांबळे**
राजर्षीनगर, नागपूर

# आंबेडकरी समाजाची प्रचंड हानी

प्रा. रणजीत मेश्राम यांच्या जाण्याने समाजाची भूमिका निर्भिडपणे मांडणारा, आंबेडकरी विचारांचा चिंतक, प्रचारक, तत्वनिष्ठ विचारवंत, भाष्यकार, प्रभावी वक्ता, समाज जागवणारा, समाजाचा दिशादर्शक खंबीर, सघर्षशील स्तंभ मस्तिष्कघाताने कायमस्वरूपी निखळला. त्यांच्या जाण्याने समाजाची प्रचंड हानी झाली. त्यांच्या स्मृतींना माझी विनम्र, भावपूर्ण आदरांजली.

**– प्राचार्य भाऊ वासनिक**
9423606064

# स्मरणांजली

मंगळवार दि. 1 जुलैला डॉ. आंबेडकर इंटरनॅशनल कन्व्हेशन सेंटर, कामठी रोड, नागपूर या ठिकाणी कर्मवीर बाबू हरिदास आवळे यांचा 110 वा जयंती महोत्सव पार पडला. कार्यक्रम सुरु होण्यापूर्वी कार्यक्रमाचे मुख्य अतिथी मा. प्रा. रणजित मेश्राम सर माझ्या शेजारी बसले, 'काय कविराज कसे आहात म्हणाले.' 'ठीक आहो सर' मी म्हणालो. मी त्यांना हळूच विचारले, सर मागे आपणास जीवनगौरव पुरस्कार मिळाला. त्या कार्यक्रमात मी आपणास माझा काव्यसंग्रह पत्र लिहिण्याचे कारण की... भेट दिला होता, तो आपण वाचला काय? असे म्हटले, त्यावर सर म्हणाले, हो कविराज. त्यात तू आपल्या व्यवसायावर वीस कविता केल्या आहेस. चांगल्या वाटल्या तुझ्या कविता. मी आताआत्ताच कापड खरेदी करायला सदरमधील ब्ल्यूशॉप मध्ये गेलो होतो, तेंव्हा तुझी आठवण आली आणि कापड विकत घेऊन तुझ्याकडे येण्याचा विचार केला होता. पण दुकानदार म्हणाले सर अभी आपको यही कपडे सिलकर मिलेंगे, आप नाप दिजीये. त्या दुकानदार मालकाशी माझे फार जुणे संबंध आहेत. म्हणून मी त्यांना नाही म्हणू शकलो नाही. मी सरांना काही हरकत नाही म्हटले व हे सुद्धा सांगीतले की कपड्याचे दुकानदार आजकाल ग्राहकांना कपडे तिथेच शिवण्याचा आग्रह करतात. त्यामुळे टेलर व्यवसाय डबघाईस आला आहे आणि हो सर प्रत्येक माणसाने टेलर आणि नाव्ही (केस कटींग)चे दुकान कधीही बदलवू नये. आपण नेहमी ज्यांच्याकडे जातो, त्यांच्याचकडे जावे. सरांनी माझा पत्ता विचारला मी डॉ. आंबेडकर कॉलनी, लष्करीबाग सांगितले व आमची वस्ती आवळे बाबुंनीच वसवली आहे हे सांगीतले व तेंव्हा आमच्या वस्तीत प्रत्येकाच्या घरी आवळे बाबूंची फोटो होती असेही सांगितले. मग आमच्या साहित्यिकी चर्चा मस्त रंगल्या. सरांनी कविता आणि गझल हा काय प्रकार असतो ते विचारले व काही कवी आपले आडनाव लपवून ब्राम्हणांशी मैत्री करतात असे निदर्शनात येते व तुमच्या कवि लोकातही अनेक गट आहेत असे ऐकले आहे, खरे आहे कां? असे म्हणाले. मी हसलो व म्हणालो, मी अश्या कोणत्याही गटात अडकलो नाही सर. एवढ्यात सरांना विचारमंचावर येण्यासाठी विनंती करण्यात आली. सरांनी परिसंवादात मार्गदर्शन करताना माझ्या वस्तीचा माझ्या सांगण्याप्रमाणे उल्लेख केला.प्रा. रणजित मेश्राम सरांशी मनमोकळ्या चर्चा झाल्याने मला या ज्ञान सागराला भेटुन एक वेगळाच आनंद झाला होता. आज प्रा. रणजित मेश्राम सरांना आदरांजली वाहतांना हृदय दाटून येत आहे.

**– प्रकाश बावनगडे**

# हे एक प्रकारचे घर

**अनंतायन**



**ॲड. अनंत खेळकर**
**मो. 9370061677**

कुणाच्याही मनात कुणाविषयी प्रेमाचा अंकूर सहजासहजी फुटत नाही. मन हे एक प्रकारचे घर आहे म्हणून या घराच्या चाव्या भलत्याच्या हाती दिल्या जात नाहीत. सर्वांनाच या घराचा पत्तासुद्धा दिला जात नाही. सौंदर्याची पोहेच ही डोळ्यापर्यंतच असते. पण गुणांची पोहेच ही मनापर्यंत असते. एकदा का मन जिंकले तर मनाच्या घरात प्रवेश करण्याचा मार्ग आपोआप मोकळा होतो. कुणाला फुल देणे याला प्रेम म्हणत नाहीत, तर कुणाचे फुलासारखे संरक्षण करणे हे खरे प्रेम आहे. प्रेम कुणाला जबरदस्तीने बांधून ठेवत नाही. प्रेम हा स्नेहाचा रेशमी धागा आहे ही मजबुरीची साखळी नाही. काही प्रेमाचे नाते असे असतात की, हातात हात नसला तरी मनाचे मनाशी जुळलेली घट्ट विण असते. 'ऐसा नहीं की दिल में तेरी तस्वीर नहीं है, बस मेरे हाथों में, तेरे नाम की लकीर नहीं है' या नात्याला भलेही नाव नसेल पण मनात मात्र भाव असतो. 'वो खास होता है, किसी के लिए, वो आम नहीं होता, गहराई बहुत रहती हैं रिश्तों में, बस कोई नाम नहीं होता' प्रेम आणि पसंती या दोन भिन्न गोष्टी आहेत. जसे की, ज्यांना फुल पसंत पडते ते या फुलाला तोडून आपल्याजवळ ठेवतात, पण ज्यांचे फुलावर प्रेम असते ते त्याची निगा राखतात. काहीजण शरीराने जरी दुर असले तरी आयुष्यभर मनाने जुळलेले असतात 'ना महीनों की गिनती, ना सालों का हिसाब है, मोहब्बत आज भी तुमसे, बेइंतहा, बेहिसाब है' ही भावना त्यांच्या काळजावर कोरली गेलेली असते. प्रेम हे शारिरीक सौंदर्यापेक्षा मनाच्या सुंदरतेवर असावे. 'हुस्न के कसीदे तो, गड़ती रहेगी महफ़ीलें, झुर्रियाँ भी प्यारी लगे, तो मान लेना इश्क़ है' प्रेमाचे नाते हे वाऱ्याच्या झुळूकेसारखे असते. दिसत नसले तरी आपुलकीच्या स्पर्शाची जाणीव करून देते. खरे प्रेम असणारी व्यक्ती परमेश्वराजवळ एकच प्रार्थना करते की, 'ये जिवन जितनी बार मिले, हर बार मुझे तेरा प्यार मिल' खऱ्या प्रेमात गोडी निर्माण करायची असेल तर फक्त एवढेच करावे. 'घी वफ़ा का डालिए, शक्कर रहे ज़ुबान, खूब लज़ीज़ बन जाएँगे, रिश्तों के पकवान'. ■ ■

बहुजन सौरभ

# प्रश्नाचे उत्तर शोधणारे रणजित मेश्राम सर

रिपब्लिकन विद्यार्थी फेडरेशन च्या कार्यकर्ते, पदाधिकारी पासून ते आंबेडकरवादी बुद्धिजीवी पर्यंतची जबाबदारी प्रा. रणजित मेश्राम सरांनी शेवटच्या क्षणापर्यंत सांभाळली. पी.डब्ल्यु.एस. महाविद्यालयात नेहमी आंबेडकरी समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक विकासाच्या प्रश्नावर चर्चा होत असत. आमच्या प्रश्नाचे विस्तृत विश्लेषण करून उत्तर शोधण्याचा प्रयत्न करत. कारण ते जमिनीवर चे कार्यकर्ते, पदाधिकारी ते बुद्धिजीवी होते म्हणून ते प्रश्नाचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न करत होते. त्यांची उणीव भरून काढणारे बुद्धिजीवी निर्माण होणार का ? जे प्रश्नाचे उत्तर समजावुन सांगणार का ? हे प्रश्न आपल्या समोर 'सर' सोडून गेले.

**– संजय फुलझेले**

# स्त्रीशक्ती : काल, आज आणि उद्या



मानवजातीच्या इतिहासात जर एखादी शक्ती सतत संघर्ष करत पुढे आली असेल, तर ती म्हणजे स्त्रीशक्ती. तिच्या हातात मायेची ऊब आहे, डोळ्यांत स्वप्नांची चमक आहे आणि मनात अढळ जिद्द आहे. स्त्री ही केवळ घर सांभाळणारी व्यक्ती नाही; ती समाज घडवणारी, संस्कृती टिकवणारी आणि भविष्याला दिशा देणारी शक्ती आहे. महिला दिन हा केवळ एक दिवस साजरा करण्याचा उत्सव नाही; तो स्त्रीच्या संघर्षाला, तिच्या यशोगाथांना आणि तिच्या अदम्य आत्मविश्वासाला अभिवादन करण्याचा दिवस आहे. काल पाहिला तर स्त्रीचे आयुष्य अनेक बंधनांनी वेढलेले होते. शिक्षणाची दारे बंद होती, स्वप्नांना मर्यादा होत्या आणि समाजात स्वतंत्र ओळख निर्माण करण्याची संधी फारच कमी होती. तरीही या अंधारात काही तेजस्वी दिवे पेटले. शिक्षणाचा दीप पेटवणाऱ्या सावित्रीबाई फुले यांसारख्या स्त्रियांनी समाजाला नवी दिशा दिली. मुलींना शिक्षण मिळावे म्हणून त्यांनी विरोध, अपमान आणि संकटांना सामोरे जात शाळा सुरू केल्या. त्यांचा संघर्ष सांगतो की एका स्त्रीचा निर्धार हजारो मुलींच्या आयुष्याला उजेड देऊ शकतो. त्याचप्रमाणे झाशीची राणी लक्ष्मीबाई ही धैर्याची जिवंत प्रतिमा ठरली. स्वातंत्र्यासाठी लढताना तिने दाखवलेले शौर्य हे स्त्रीशक्तीचे तेजस्वी उदाहरण आहे. 'मी माझी झाशी देणार नाही' असा तिचा निर्धार आजही प्रेरणा देतो. इतिहासातील या स्त्रियांनी समाजाला दाखवून दिले की स्त्री ही केवळ सहन करणारी नाही; ती अन्यायाविरुद्ध लढणारी शक्ती आहे. आजचा काळ स्त्रीच्या कर्तृत्वाचा आणि आत्मविश्वासाचा आहे. आज स्त्री विज्ञान, शिक्षण, क्रीडा, प्रशासन, उद्योग अशा प्रत्येक क्षेत्रात आपली छाप उमटवत आहे. अंतराळात झेप घेणाऱ्या कल्पना चावला यांचे स्वप्न लाखो मुलींना आकाशाला भिडण्याची प्रेरणा देते. बॉक्सिंगच्या रिंगमध्ये कठोर परिश्रमाने जग जिंकणारी मेरी कोम ही जिद्दीची जिवंत कहाणी आहे. अशा अनेक स्त्रिया आज समाजात नवे आदर्श निर्माण करत आहेत. आजची स्त्री घर आणि करिअर या दोन्ही जबाबदाऱ्या समर्थपणे पेलते. ती मुलांना संस्कार देते, कुटुंब सांभाळते आणि त्याच वेळी समाजाच्या प्रगतीत महत्त्वाचा वाटा उचलते. तरीही काही आव्हाने अजूनही उभी आहेत, समानतेचा प्रश्न, सुरक्षिततेचा प्रश्न आणि समाजाच्या काही जुन्या मानसिकता. पण आजची स्त्री गप्प बसणारी नाही. ती प्रश्न विचारते, आवाज उठवते आणि स्वतःचा मार्ग तयार करते. उद्याचा काळ अधिक उज्ज्वल आणि समतावादी असावा हीच अपेक्षा आहे. तो काळ असा असावा जिथे मुलगा आणि मुलगी यांच्यात कोणताही भेदभाव नसेल. जिथे प्रत्येक मुलीला तिच्या क्षमतेनुसार संधी मिळेल. जिथे तिच्या स्वप्नांना मर्यादा नसतील. उद्याचा समाज असा घडवायचा आहे की जिथे स्त्रीला स्वतःच्या कर्तृत्वावर उभे राहण्याची संधी आणि सन्मान दोन्ही मिळतील. स्त्रीशक्तीचा इतिहास आपल्याला एक मोठा संदेश देतो, बदल हा संघर्षातून जन्माला येतो. एका स्त्रीने शिक्षणासाठी लढा दिला म्हणून हजारो मुलींना शिक्षणाचा मार्ग खुला झाला. एका स्त्रीने अन्यायाविरुद्ध आवाज उठवला म्हणून समाजाला नवा विचार मिळाला. आज आपण ज्या संधी अनुभवतो, त्या अनेक स्त्रियांच्या जिद्द आणि त्यागामुळे शक्य झाल्या आहेत. आजच्या पिढीची जबाबदारी आहे की या संघर्षाच्या वारशाला पुढे नेण्याची. मुलींनी स्वतःवर विश्वास ठेवला पाहिजे, स्वप्न पाहण्याचे धाडस केले पाहिजे आणि मेहनतीने त्या स्वप्नांना साकार केले पाहिजे. मुलांनीही स्त्रीला स्पर्धक म्हणून नव्हे, तर सहप्रवासी म्हणून स्वीकारले पाहिजे. कारण समाजाची खरी प्रगती स्त्री आणि पुरुष या दोघांच्या समान सहभागातूनच घडते. महिला दिनाच्या निमित्ताने आपण एक ठाम संकल्प करूया, 'स्त्रीला शिक्षण देण्याचा, तिच्या स्वप्नांना पंख देण्याचा, तिच्या कर्तृत्वाचा सन्मान करण्याचा.' कारण, स्त्रीच्या संघर्षाने इतिहास घडवला, तिच्या कर्तृत्वाने वर्तमान उजळले आणि तिच्या स्वप्नांनी उद्याचा मार्ग प्रकाशमान होणार आहे. म्हणून आज बुलंद आवाजात सांगूया, स्त्रीशक्ती ही केवळ शब्द नाही, ती परिवर्तनाची ज्योत आहे, ती समाजाला दिशा देणारी प्रेरणा आहे आणि मानवजातीच्या उज्ज्वल भविष्याची सर्वात मोठी आशा आहे. ■ ■

**छाया शहाणे**
**मो. 7020588484**

# संघर्ष, विचार आणि दीपस्तंभ माझे वडील



आयुष्यात काही व्यक्ती अशा असतात की त्यांच्या अस्तित्वाची जाणीव आपल्याला ते आपल्या सोबत असताना पूर्णपणे होत नाही. पण त्यांच्या जाण्यानंतर प्रत्येक क्षणी त्यांच्या विचारांची, शब्दांची आणि संस्कारांची उब मनाला जाणवत राहते. माझे वडील हे माझ्यासाठी केवळ जन्मदाते नव्हते, तर जीवन जगण्याची दृष्टी देणारे गुरु, संघर्षात खंबीर राहण्याची प्रेरणा आणि माणुसकीचा खरा अर्थ शिकवणारे मार्गदर्शक होते. त्यांच्या साध्या जीवनामागे त्याग, जिद्द आणि समाज प्रेमाची विलक्षण कहानी दडलेली होती. माझे वडील चरणदास देशपांडे यांचा जन्म 1 सप्टेंबर 1940 रोजी कुही तालुक्यातील मांढळ येथे सामान्य कुटुंबात झाला. परंतु त्यांच्या विचारांची उंची मात्र असामान्य होती. जीवनात संपत्तीपेक्षा विचारांची श्रीमंती महत्त्वाची असते, याचे जिवंत उदाहरण म्हणजे त्यांचे व्यक्तिमत्व होय. कठीण परिस्थितीत वाढत असतानाही त्यांनी स्वतःचे जीवनमूल्य, शिक्षण आणि समाज प्रबोधन यासाठी जगले. त्यांच्या विचारांवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि संत गाडगेबाबा यांच्या कार्याचा खोल प्रभाव होता. अंधश्रद्धा, कर्मकांड आणि आंधळ्या देव भक्तीला त्यांनी आयुष्यभर ठाम विरोध केला. देवापेक्षा माणूस आणि माणुसकी मोठी, हा त्यांचा ठाम विश्वास होता. विवेकवाद, स्वाभिमान आणि वैज्ञानिक दृष्टिकोन हेच त्यांच्या जीवनाचे आधारस्तंभ होते. 14 ऑक्टोबर 1956 रोजी झालेल्या ऐतिहासिक 'धम्मचक्र प्रवर्तन दिन' सोहळ्यात प्रत्यक्ष उपस्थित राहून त्यांना डॉ. बाबासाहेबांचे दर्शन घेण्याची संधी लाभली. 'हा क्षण त्यांच्या आयुष्यातील परिवर्तनाचा टप्पा ठरला. त्या दिवसानंतर सामाजिक समता, शिक्षण आणि जागृती यासाठी काम करण्याची प्रेरणा त्यांनी आयुष्यभर जपली. लहानपणापासूनच शिक्षणाची तीव्र महत्त्वाकांक्षा त्यांच्या मनात होती. त्यांचे थोरले बंधू हे डॉ. बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाणानंतर बौद्ध धम्माच्या कार्यात होते. त्यांच्या पाऊलखुणा जपत लहानाचे मोठे झाले. वकील बघण्याचे स्वप्न त्यांनी पाहिले होते. धम्मचक्र परिवर्तन दिनाच्या सोहळ्याचे झालेले विलक्षण परिणाम म्हणजे त्यांनी उराशी वकील होण्याचे स्वप्न बाळगले. पुढील शिक्षणासाठी नागपूरला जाण्याची इच्छा वडिलांसमोर व्यक्त केली. पण वडिलांनी त्यासाठी नकार दिला. पण त्याला न जुमानता घर सोडण्याचा निर्णय घेतला. म्हणतात ना, डॉ. बाबासाहेबांची प्रेरणा एकदा मिळाली की तो व्यक्ती प्रवाहाच्या विरुद्ध वागायला लागतो. त्या प्रेरणे खातरच त्यांनी स्वतःचे घर सोडावे लागले खिशात फक्त 139 रुपये होते. पण उराशी स्वप्न मात्र हजारोंची होते. ही घटना त्यांच्या जिद्दीची व विलक्षण स्वप्नांची होते. पण म्हणतात ना सगळ्याच सोंग घेता येते पण पैशाचे नाही. पैसा व घरच्यांच्या पाठिंबा नसल्यामुळे त्यांना वकिली करता आली नाही. पण स्वप्न मात्र हजारोंचीच. घरचा पारंपारिक व्यवसाय शिवणकामाचा असला तरी तो कोणाकडून शिकला नाही, स्वतःच्या निरीक्षणातून आणि अथक प्रयत्नातून त्यांनी शिवणकाम आत्मसात केले. पुढे हाच गुण त्यांनी समाजहितासाठी वापरला. जिल्हा परिषद शिक्षक म्हणून कार्य करताना शालेय शिस्तीबाबत ते अत्यंत जागरूक असत. विद्यार्थ्यांवर त्यांचे अपार प्रेम होते. एखाद्या गरीब विद्यार्थ्याचा गणवेश योग्य नसल्यास ते स्वतः मोफत शिवून देत असत. शिक्षक म्हणून ते केवळ ज्ञानदाता नव्हते, तर विद्यार्थ्यांचे पालक, मार्गदर्शक आणि आधारवड होते. त्यांना वाचनाची विलक्षण आवड होती. पुस्तक हेच त्यांचे खरे सोबती होते. संत साहित्य, सामाजिक विचार आणि क्रांतिकारी लेखन त्यांनी मनापासून आत्मसात केले. संत कबीर आणि संत तुकाराम यांच्या विद्रोही सत्यनिष्ठ आणि समाज जागृती करणाऱ्या विचारांनी ते भारावून गेले होते. अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे आणि सत्याची बाजू घेणे हा त्यांचा स्वभाव बनला होता. इंग्रजी भाषेवर त्यांचे उल्लेखनीय प्रभुत्व होते. ग्रामीण भागात कार्यरत असताना ही त्यांनी विद्यार्थ्यांना आत्मविश्वासाने इंग्रजी आणि मराठी शिकविले. संत ज्ञानेश्वर यांच्या 'ज्ञानेश्वरी'तील पसायदान व त्याचा भावार्थ भिवापूर परिसरातील शाळांमध्ये पोहोचविण्याचे कार्य केले. खेळांबद्दलही त्यांना विशेष प्रेम होते. कबड्डी आणि खो खो या पारंपारिक खेळांचे ते उत्तम जाणकार होते. विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, संघभावना आणि जिद्द निर्माण करण्यासाठी ते खेळाला शिक्षणाइतकेच महत्त्व देत असत. त्यांचे संपूर्ण आयुष्य साधेपणा, प्रामाणिकपणा आणि समाजनिष्ठेचे प्रतिक होते. त्यांनी कधी प्रसिद्धीची अपेक्षा ठेवली नाही, परंतु असंख्य विद्यार्थ्यांच्या आणि सहकाऱ्यांच्या जीवनात त्यांनी विचारांचा प्रकाश पेटवला. 7 मार्च 2001 ला ते आम्हाला पोरके करून गेले. आज ते आमच्यात नसले तरी त्यांनी दिलेले संस्कार, विचारांची परंपरा आणि संघर्षातून उभे केलेले जीवन आमच्यासाठी अमूल्य ठेवा आहे. त्यांनी शिकवलेली मूल्येच आमच्या जीवनाचा मार्गदर्शक दीप आहेत. त्यांचे जीवन आम्हाला एक संदेश देऊन जाते. 'परिस्थिती माणसाला मर्यादा घालू शकते, पण विचार आणि शिक्षण त्याला अमर बनवतातव.' दादांच्या स्मृतींना विनम्र अभिवादन! ■ ■



**शालिनी मेश्राम**
**मो.9657196833**

# मानवी समाज म्हणून स्त्रीमुक्तीचे अन्वयार्थ

दैववाद, ईश्वरवाद आणि अध्यात्म यांच्या संकल्पना अनेकदा शोषकांना नैतिकतेचे आवरण देतात. परंतु ही नैतिकता प्रत्यक्षात दुष्ट स्वरूपाची असते, कारण ती शोषणाला शोषितांचीच संमती मिळवून देते. हजारो वर्षे या मानवघातकी व्यवस्थेविषयी समाजात शंका निर्माण झाली नाही. अशा अमानुषतेला सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त झाली. परिणामी चुकीचे संस्कार, चुकीचे प्रश्न आणि चुकीची उत्तरे अशी एक दुष्ट साखळी तयार झाली. वैदिक धर्मातील मूलभूत तत्त्वांचा लोप, यज्ञसंस्थेला प्राप्त झालेले अवास्तव महत्त्व, ब्राह्मणांचे वर्चस्व, आत्मिक शांतीचा अभाव, क्लिष्ट भाषा, तसेच रूढी-परंपरांवर अधिक भर यांमुळे धार्मिक क्षेत्रात वैचारिक संघर्ष निर्माण झाला. त्यामुळे इ.स.पूर्व सहावे शतक भारतीय इतिहासात अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. त्या काळातील समाजाच्या धार्मिक-सामाजिक गरजा ओळखून मार्गदर्शन करण्याचे कार्य गौतम बुद्धांनी केले. बुद्धांनी वैज्ञानिक दृष्टिकोनातून सजीव सृष्टीची उत्पत्ती उत्क्रांतीतून झाल्याचे प्रतिपादन केले. त्यामुळे मानवी विकास शारीरिक, मानसिक आणि बौद्धिक पातळीवर व्हायला हवा, असे त्यांचे तत्त्वज्ञान सांगते. बुद्धधम्म हा पूर्णतः मानवकेंद्री आहे. पंचशील ही बुद्धांची चारित्र्यनिर्मितीची तत्त्वे आहेत. हिंसा न करणे, चोरी न करणे किंवा लुबाडणूक न करणे, कामवासनेवर संयम ठेवणे आणि मादक पदार्थांचे सेवन टाळणे ही पंचशीलातील तत्त्वे आहेत. यांपैकी कोणतेही तत्त्व मोडले तर मनुष्याच्या चारित्र्यावर परिणाम होतो. तथागत बुद्धांनी त्यांच्या आधी अस्तित्वात असलेल्या अनेक अनिष्ट आणि अमानुष चालीरीतींवर पंचशीलाच्या माध्यमातून प्रहार केला. बुद्ध म्हणतात की, एका व्यक्तीला कदाचित नियमांची गरज नसते; पण समाजरचना उभी करायची असेल तर नियमांची आवश्यकता असते. बुद्ध मानवतावादी होते. म्हणूनच त्यांनी आदर्श समाजाची व्याख्या समता, स्वातंत्र्य, बंधुत्व आणि न्याय या तत्त्वांवर आधारलेली केली. ही मूल्ये सार्वत्रिक आणि वैश्विक आहेत. स्त्री-पुरुष विषमता बुद्धांना मान्य नव्हती. मानवी मूल्यांवर आधारित समाजक्रांतीचा पाया त्यांनी घातला. स्त्रीच्या स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाची आणि तिच्या मानवी प्रतिष्ठेची प्रस्थापना भारतीय इतिहासात प्रथम बुद्धांनी केली. स्त्रीस्वातंत्र्याचा पहिला ऐतिहासिक दस्तावेज 'थेरीगाथा'मध्ये आढळतो. बुद्धांनी भिक्षुणी संघ स्थापन करून स्त्रियांना आत्मोन्नतीचा मार्ग खुला केला. विहारांच्या माध्यमातून भिक्षुणी व उपासिकांसाठी शिक्षणाच्या संस्था निर्माण झाल्या. विवाहित, अविवाहित, विधवा किंवा गणिका सर्व स्त्रियांना ज्ञान, समता आणि स्वातंत्र्याची संधी देण्यात आली. सम्यक संबोधी प्राप्त केल्यानंतर बुद्ध कपिलवस्तू नगरीत आले तेव्हा त्यांच्या स्वागतासाठी सर्वजण उपस्थित होते; मात्र यशोधरा आली नव्हती. बुद्धांनी तिच्या मनाची जाणीव ठेवून स्वतः तिच्या महालात जाऊन भेट घेतली. स्त्रीत्वाचा सन्मान राखण्याची ही त्यांची संवेदनशीलता होती. हा आदर केवळ कुलीन स्त्रियांपुरता मर्यादित नव्हता; आम्रपालीसारख्या गणिकेलाही त्यांनी तेवढाच मान दिला. प्रा. सुशीला जाधव यांच्या मते, बुद्धकाळात स्त्रियांमध्ये वैचारिक प्रगल्भता निर्माण झाली. कौटुंबिक जबाबदाऱ्या स्वतंत्रपणे सांभाळण्याची क्षमता त्यांच्यात विकसित झाली. आपले केस विकून भिक्षूंना भोजन देणाऱ्या उपासिका आणि आपले दागिने विकून विहार बांधणाऱ्या विशाखासारख्या स्त्रिया त्या काळात घडल्या. भिक्षुणी संघात अनेक स्त्रियांना अरहंत पद प्राप्त झाले होते. धम्माने स्त्रियांना तत्त्वज्ञान, निर्वाण, अभ्यास आणि सर्वांगीण विकासासाठी स्वातंत्र्य दिले. स्त्री पुरुषाइतकीच प्रज्ञावंत आहे हे स्पष्ट झाले. मनुस्मृतीचा काळ मनुस्मृतीचा काळ म्हणजे पुष्यमित्र शुंगाचा काळ मानला जातो. या काळात स्त्रीस्वातंत्र्याच्या वाटा बंद झाल्या. स्त्रीचे व्यक्तिमत्त्व नष्ट करून तिला पुरुषाच्या अधीन ठेवण्यात आले. व्रत-कर्मकांड आणि अंधश्रद्धांच्या चौकटीत स्त्रीला कैद करण्यात आले. धर्म आणि संस्कृतीच्या नावाखाली जातीव्यवस्थेच्या भिंती अधिक मजबूत केल्या गेल्या. मनुस्मृतीनुसार स्त्रीने आयुष्यभर पिता, पती आणि पुत्र यांच्या अधीन राहावे. स्त्री स्वातंत्र्यास अयोग्य आहे, असा मनूचा दावा होता. विवाह हा पवित्र विधी असल्याचे सांगून घटस्फोटाला मनाई करण्यात आली. प्रत्यक्षात स्त्रीला पुरुषाच्या अधीन ठेवणे आणि पुरुषाला स्वैराचाराचे स्वातंत्र्य देणे हा मनूचा हेतू होता. बौद्धकाळात स्त्रियांना मिळालेले स्वातंत्र्य हिरावून घेण्यासाठी मनुस्मृतीची रचना झाली. स्त्रिया आणि शूद्र बौद्धधर्माकडे वळू लागल्याने त्यांना रोखण्यासाठी कठोर सामाजिक-धार्मिक बंधने लादण्यात आली. त्यामुळे स्त्रियांचे जीवन अत्यंत परावलंबी, अज्ञानी आणि अधिकारहीन बनले. पुढे पेशवेकाळात स्त्रियांची स्थिती अत्यंत दयनीय झाली. मुलगी जन्माला येणेही अशुभ मानले जाई. एका पुरुषाला अनेक विवाह करण्याची मुभा होती. त्यामुळे लहान मुलींचे विवाह वृद्ध पुरुषांशी लावले जात. सतीप्रथा अस्तित्वात होती आणि विधवांना पुनर्विवाहाची परवानगी नव्हती. विधवांचे मुंडन करून त्यांना सामाजिक अपमान सहन करावा लागे. त्या काळातील स्त्रीची अवस्था पुढील ओळींमध्ये व्यक्त होते,



**'धुमसत्या वनव्यापरी जिने माझे, ना जळणे माझे, ना विझणे माझे;**
**ना जगणे माझे, ना मरणे माझे.'**

इ.स. 1818 मध्ये पेशवाईचा पराभव झाला आणि ब्रिटिश सत्तेची सुरुवात झाली. पेशवाईचा अंत म्हणजे एका प्रकारच्या सामाजिक गुलामगिरीचा अंत होता, जरी त्याऐवजी ब्रिटिश सत्तेची गुलामगिरी आली. एकोणिसाव्या शतकात क्रांतीबा ज्योतिराव फुले यांनी स्त्री-शूद्र-अतिशूद्र मुक्तीचे मूलगामी आंदोलन उभारले. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी म्हणतात की, बहुजन समाजात आत्मप्रत्यय आणि आत्मपरीक्षण जागृत करणारा माणूस म्हणजे ज्योतिराव फुले. सावित्रीबाई फुले या भारतीय स्त्रीमुक्ती चळवळीतील महानायिका ठरल्या. स्त्रीशिक्षणावर धार्मिक बंदी असताना त्यांनी पहिली मुलींची शाळा सुरू केली. त्यांनी घराचा उंबरठा ओलांडून शिक्षणाचा दीप प्रज्वलित केला. तो क्षण भारतीय समाजक्रांतीचा प्रारंभ ठरला.

**भारतीय समाजसुधारकांचे योगदान :–** ब्राह्मो समाज, प्रार्थना समाज आणि आर्य समाज यांनीही समाजसुधारणेचे काही प्रयत्न केले. राजा राममोहन रॉय यांच्या प्रयत्नांमुळे 1829 मध्ये सतीप्रथा बंद करणारा कायदा झाला. 1856 मध्ये विधवा पुनर्विवाह कायदा मंजूर झाला. पंडिता रमाबाई यांनी स्त्रियांच्या शिक्षणासाठी शारदा सदनची स्थापना केली. ताराबाई शिंदे यांनी 'स्त्री-पुरुष तुलना' हा ग्रंथ लिहून समाजातील स्त्रीविषयक दुटप्पीपणावर प्रखर टीका केली. महर्षी धोंडो केशव कर्वे, फातिमा शेख, बाळशास्त्री जांभेकर, लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख यांनीही समाजजागृतीसाठी मोलाचे कार्य केले.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्त्रीमुक्तीचे शिल्पकार :–** भारतीय स्त्रियांच्या उन्नयनात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान अत्यंत मोलाचे आहे. त्यांनी चळवळीच्या माध्यमातून सामाजिक जागृती केली आणि कायद्याच्या माध्यमातून स्त्रियांना अधिकार मिळवून दिले. 1927 मध्ये महाड येथे त्यांनी महिलांना आवाहन केले की समाजातील अडचणी सोडविण्यासाठी स्त्री-पुरुषांनी एकत्र येऊन काम केले पाहिजे. 20 जुलै 1942 रोजी नागपूर येथे झालेल्या 'ऑल इंडिया डिप्रेस्ड क्लासेस वूमन्स कॉन्फरन्स'मध्ये त्यांनी स्त्रियांच्या संघटनेच्या शक्तीवर विश्वास व्यक्त केला. कामगार मंत्री म्हणून त्यांनी महिलांना समान वेतन, प्रसूती रजा आणि कामाच्या ठिकाणी पाळणाघरांची सोय यांसारख्या सुधारणा केल्या. भारतीय संविधानाद्वारे स्त्री-पुरुष समतेला कायदेशीर मान्यता दिली. 'एक व्यक्ती एक मत' सोबतच 'एक व्यक्ती एक मूल्य' ही क्रांतिकारी संकल्पना त्यांनी मांडली. हिंदू कोड बिल हे स्त्रीमुक्तीचे महत्त्वपूर्ण पाऊल होते. स्त्रियांना मालमत्ता, विवाह आणि घटस्फोटाचे अधिकार देण्याचा त्याचा उद्देश होता. परंतु पुराणमतवादी विरोधामुळे हे बिल तात्काळ मंजूर झाले नाही. या घटनेच्या निषेधार्थ आंबेडकरांनी कायदेमंत्री पदाचा राजीनामा दिला. पुढे त्यातील अनेक तरतुदी स्वतंत्र कायद्यांच्या रूपाने लागू झाल्या. महात्मा फुले आणि डॉ. आंबेडकर हे स्त्रीमुक्ती चळवळीचे दोन प्रमुख स्तंभ ठरतात. एकाने समतेचा पाया घातला, तर दुसऱ्याने संविधानाच्या माध्यमातून त्याला कायदेशीर अधिष्ठान दिले.

**आजची स्त्रीमुक्ती चळवळ :–** आजची स्त्री आंबेडकरवादी विचारांचा वारसा पुढे नेत आहे. स्त्रीवाद म्हणजे स्त्रीला मानवी हक्क मिळवून देण्याचे तत्त्वज्ञान. ही संपूर्ण सामाजिक परिवर्तनाची मानसिकता आहे. स्त्रीमुक्ती म्हणजे पुरुषद्वेष किंवा कुटुंबविघातक प्रवृत्ती असा गैरसमज अनेकदा पसरवला जातो. परंतु स्त्रीवादाचा मूलभूत हेतू स्त्री-पुरुष समानतेवर आधारित मैत्रीपूर्ण आणि न्याय्य नातेसंबंध निर्माण करणे हा आहे. संयुक्त राष्ट्र संघाने 1975 हे वर्ष आंतरराष्ट्रीय महिला वर्ष म्हणून घोषित केले, तर 8 मार्च हा आंतरराष्ट्रीय महिला दिन म्हणून साजरा केला जातो. स्त्रियांच्या प्रश्नांवर मोर्चे, परिसंवाद आणि जनजागृती मोहिमा राबविण्यात आल्या. स्त्रीमुक्तीसाठी केवळ कायदे पुरेसे नाहीत; पुरुषांची मानसिकता आणि समाजाचा दृष्टिकोन बदलणेही तितकेच आवश्यक आहे. स्त्री-पुरुष नातेसंबंध भयमुक्त आणि प्रगल्भ झाले तरच सामाजिक न्याय आणि समतेची स्थापना शक्य होईल. आजही स्त्रीचळवळीसमोर अनेक आव्हाने आहेत. स्त्रियांच्या अस्मितेबद्दलची जाणीव अधिक व्यापक करणे, प्रभावी संघटनांचे जाळे उभारणे आणि सार्वजनिक निर्णय प्रक्रियेत स्त्रियांचा प्रभाव वाढवणे ही काळाची गरज आहे. ■ ■



**सरिता सातारडे**
**मो. 8308853051**

स्वाभिमानाचे स्मरणशिल्प -९६

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा शुक्रवारी बाजार, कामठी, नागपूर



नागपूर जिल्ह्यातील ता. कामठी असून आंबेडकरी चळवळीतील महत्वाचे ठिकाण आहे. जयभीम जनक बाबू हरदास यांच्या नावाने कामठी ओळखल्या जातो. बाजारपेठ परिसरातील सर्व समाजबांधव दिनविशेषला डॉ. बाबासाहेबांना वंदन करतात.

संवाद मित्र,कपिल नारनवरे
मो.9370773608

# चुकीच्या राजकारणाने खचलेल्या बौद्ध धम्मियांचे मनोबल उंचावले ...

## बीडीएसपी संघाच्या धम्म कार्यशाळेत व बाल धम्म संस्कार शिबिरात








**नागपूर :** फाल्गुन पौर्णिमेला शांतिवन चिचोली फेटरी, येथे संपन्न झालेल्या बीडीएसपी संघाच्या धम्म कार्यशाळेत व बाल धम्म संस्कार शिबिरात, 7 हजारांहून अधिक बौद्ध उपासिका व बौद्ध उपासक तसेच पदवीधर व सर्व वयोगटातील मुला मुलींनी सहभाग घेऊन बीडीएसपी संघाच्या कार्यावर विश्वास व्यक्त केला. कार्यशाळेच्या प्रारंभी फेटरी ते शांतिवन चिचोली या 3 किलोमीटर अंतरावर मुला-मुलींनी सकाळी धम्म मशालीला घेऊन दौड करीत कार्यक्रम स्थळी स्थापित केले. बोधिसत्व डॉ. बाबासाहेबांनी 14 ऑक्टोबर 1956 ला अशोक विजयादशमीच्या मंगल दिनी, दीक्षा दिलेल्या बौद्ध धम्माला चिरायू ठेवण्याचा जणु निर्धारच केला आहे, असे भासवणारे वातावरण निर्माण झाले होते.

पटेलनगर, गणपतीनगर (झिंगाबाई टाकळी) व कामगारनगरच्या बीडीएसपी संघाच्या युनिटनी ही कार्यशाळ व बाल संस्कार शिबिर यशस्वी करण्याची संपूर्ण जबाबदारी घेतली होती व अथक परिश्रमाने ती यशस्वी केली आणि इतक्या मोठ्या जनसमुदायाला ते न्याय देण्यात यशस्वी झाले. बुद्धांच्या 'अत्त दिपो भव' या सुत्राप्रमाणे अंतर्मुख करून प्रज्ञावंत होण्यासाठी प्रथम प्रा. सरोज वाणी यांनी पाच शील दिलीत. पुढे रतन सुत्ताचे पालित पठन व त्याचे नंतर मराठीत केलेले स्पष्टिकरण या कार्यशाळेचे खास वैशिष्ट्य ठरले. संपूर्ण जनसमुदाय तथागतांचा गंभीर उपदेश ग्रहण करण्यासाठी तयार झाला असे वाटले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ललिता शाक्य यांनी केले. तेव्हा उपस्थितानी बीडीएसपी संघाचा फाल्गुन पौर्णिमेला आयोजित धम्म कार्यशाळेचा व बाल धम्म संस्कार शिबिराचा हेतू लक्षात घेतला. त्यानंतर डॉ. बाबा वाणी यांनी बीडीएसपी संघाची भूमिका काय आहे हे समजावून सांगताना भारताची प्रतिमा, जी पूर्वी तथागतांनी जगात निर्माण केली होती, तिला परत उजळविण्यासाठी बीडीएसपी संघ कटीबद्ध असल्याचे, स्पष्ट केले आणि राष्ट्र निर्मितीचे कार्य हे बौद्ध धम्माच्या माध्यमातूनच शक्य असल्याने या बौद्ध धम्माची मुल्ये समाजात रूजविण्याची भुमिका बीडीएसपी संघाने घेतलेली आहे, हे आवर्जून सांगितले. याप्रसंगी मंचावर डॉ. धनंजय वंजारी, डॉ. सिद्धार्थ गायकवाड, प्रा. सरोज वाणी, सत्कारमूर्ती इ. मो. नारनवरे, डॉ. प्रदीप आगलावे, अनिल रामटेके आदी मान्यवर उपस्थित होते. मुलांच्या उज्वल भविष्यासाठी दिवसभर मार्गदर्शन केले. डॉ. सिद्धार्थ बोधी (गायकवाड) यांनी शासनाच्या योजना सर्वांसमोर मांडल्या व विद्यार्थ्यांनी योग्य अध्ययन करून शासकीय योजनांचा लाभ घेऊन आपले भविष्य उज्वल करावे, असा सल्ला दिला. प्रभा चौधरी (निवृत्त मुख्याध्यापिका जाईबाई चौधरी शाळा) व इ. मो. नारनवरे यांचे समाजाच्या उद्धारासाठी केलेल्या कार्याबद्दल याप्रसंगी सत्कार केला. त्यांनी आपल्या सत्काराच्या उत्तरात बीडीएसपी संघाच्या कार्याला खरे मानवतेचे कार्य म्हणून गौरान्वित केले. तसेच या कार्यात सर्वांनी सहभागी व्हावे असे आवाहन केले. डॉ. धनंजय वंजारी (आयुक्त, कर विभाग), यांनी आपली गृहस्थ जबाबदारी पार पाडत असतांनाच कर्तव्यनिष्ठ समाज निर्माण व्हावा म्हणून आपआपल्या परिने प्रयत्न करून देशाप्रती आपले असलेले कर्तव्य पार पाडून राष्ट्र निर्माण करावे असे आवाहन केले. डॉ. प्रदीप आगलावे आपल्या मार्गदर्शनात म्हणाले की, बीडीएसपी संघाचा धम्म आपल्या घरी हा एक स्तुत्य उपक्रम आहे. नीतिमान समाजाच्या निर्मितीत त्यांचे अमूल्य योगदान आहे. समाज नितीमान आणि धम्मवान होण्यासाठी बीडीएसपी संघाचे प्रशिक्षण सर्वत्र झाले पाहिजे अशी त्यांनी भावना व्यक्त केली. दहा वर्षाखालील लहान मुलांना ॲड. विजयकुमार पाटील, दिशा वानखेडे, डॉ. निकेतन जांभुळकर, डॉ. राजेश कांबळे, रोशनी गायकवाड, आर्था गायकवाड व कुलदिप टेंभुर्णे यांनी वेगवेगळ्या पद्धतींचा वापर करून ते कसे विद्वान, धम्मवान व शीलवान होतील याची काळजी घेतली. दहा वर्षावरील मुलांना अनिल रामटेके, डॉ. सिद्धार्थ बोधी (गायकवाड), राजीव खोब्रागडे, संदीप बडोले, डॉ. योगेंद्र बनसोड, डॉ. सुशांत भगत यांनी मार्गदर्शन केले. सर्व युनिटने आपआपले मनोगत व्यक्त करून मैत्री भावनेने या बीडीएसपी संघाने आयोजित केलेल्या धम्म कार्यशाळेचा लाभ घेतला. या सर्व कार्यक्रमांचे संचालन सुरज बोरघाटे यांनी केले तर आभार रघुनाथ सोमकुडे यांनी केले.

## स्मृतिशेष नीता दिलीप मुन पुरस्कार वितरण समारंभ 7 मार्चला





**नागपूर :** प्रभावती वैद्य इन्स्टिट्यूट ऑफ नॉलेज अँड एम्पॉवरमेंट नाशिक या संस्थेच्या वतीने प्रा संध्या राजुरकर आणि उषा बौद्ध यांना सन्मानीत करण्यात येत आहे. हा कार्यक्रम दि 7 मार्च 2026 ला दैनिक बहुजन सौरभ कार्यालयात सायंकाळी 5 वाजता आयोजित केला आहे. कार्यक्रमाचे अध्यक्ष दैनिक बहुजन सौरभचे मुख्य संपादक ॲड. डॉ. सिद्धार्थ कांबळे असून प्रमुख अतिथी संविधान फाउंडेशनचे दीपक निरंजन आणि महापालिका पुणेचे माजी अधिकारी आणि पालीचे गाढे अभ्यासक राम सावंत हे राहतील. तसेच प्रायोजक युको बँकेचे निवृत्त बँक प्रबंधक दिलीप मुन यांची प्रमुख उपस्थिती राहील. या कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित रहावे असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## स्मृतीशेष डॉ. आरती अनील बघेल यांना भावपूर्ण श्रद्धांजली



**नागपूर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास केन्द्र, नागपूर यांच्यावतीने शनिवारी दुपारी 4.00 वाजता पांचपावली ठक्करग्राम लायब्ररी, नागपूर येथे स्मृतीशेष डॉ. आरती अनील बघेल यांच्या स्मृतीला श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी विशेष सभा आयोजित करण्यात आली. सभेची अध्यक्षस्थानी सामाजिक नेते व संयोजक राजेश हाथीबेड तर प्रमुख अतिथी म्हणून प्रखर वक्ते मनिष कुमार मानस (गोरखपूर, उत्तर प्रदेश) आणि डॉ. अनिल बघेल उपस्थित होते.सभेत सामाजिक नेते मोतीलाल जनवारे, उमेश पिंपरे, जयसिंग कछवाह, सुनील तुरकेल, सुनील तांबे, हरिष नक्के, नरेश कलसे, अरुण तुर्केल, किरण शेन्द्रे, हेमलता पाटील यांनी डॉ. आरती बघेल यांच्या स्मृतीला श्रद्धासुमन अर्पित केले. प्रस्तावनेत चंद्रपाल सोनटक्के यांनी डॉ. आरती अनील बघेल यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. त्यांच्या सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील योगदानाची माहिती सभेला दिली.कार्यक्रमाचे संचालन किशोर बिरला यांनी केले, तर आभार महेंद्र मनपिया यांनी मानले. सर्व अतिथींनी एकमताने सांगितले की, डॉ. आरती बघेल यांच्या जीवनातील प्रेरणादायी कार्य पुढे नेऊनच त्यांना खरी श्रद्धांजली मिळेल. त्यांच्या सामाजिक व शैक्षणिक कार्याला पुढे चालना देण्याचे आवाहन सर्वांनी केले.कार्यक्रमात शत्रुघ्न महातो, उमेश हाडोते, राजकुमार खरे, मिलन तांबे, भिमराव लांजेवार, ओजस बघेल, रेहान रगडे, रूपलाल समुद्रे, कृष्णा राणे, नितेश समुद्रे, गौरीशंकर शेन्दरे, पायल पांडे, भारती समुद्रे, दिशा लांजेवार, रेणुका खरे यांच्यासह अनेक सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.



## भारतीय बौद्ध महासभा नागपूर जिल्हा कार्यकारिणी घोषित

**नागपूर :** दी बुद्धिस्ट सोसाइटी ऑफ इंडिया राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. राजरत्न आंबेडकर यांच्या दिशा निर्देशानुसार अमरज्योति बुद्धविहार, नारा रोड नागपूर येथे विभागीय सहविचार सभा महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष बुधाजी वाढविंदे यांच्या अध्यक्षतेत संपन्न झाली असून सभेमधे जिल्हा कार्यकारिणी घोषित करण्यात आली आहे. यावेळी प्रामुख्याने भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय सचिव राहुल शेंडे, राज्य सचिव हेमंत जाधव, विभागीय अध्यक्ष विजय बनसोड, सह सचिव ॲड. सोनाली मेश्राम उपस्थित होते. जिल्हा अध्यक्षपदी रंजीत राऊत, उपाध्यक्ष डॉ. राकेश हिरेखन, सचिव रवी शेंडे, कोषाध्यक्ष राजेश दहिवले, संघटक मिलिंद बनसोड, विहार समन्वयक रोशन राऊत, मीडिया समन्वयक डी.डी. गजभिये व राजेश रामटेके आणि सदस्य सुनील धमगाये, अशोक रामटेके, शालिनी लेले, अनिल दुर्गे, डॉ. सुभाष भोंगाडे, उमा दरवाडे, बेबी वानखेडे, शांता डोंगरे, सरोज मेश्राम, डॉ. प्रसन्नजीत मनोहर, विलास झाडे, अनिल वाघमारे, स्नेहा गडवे यांची निवड करण्यात आली. तसेच राज्य कमिटी कार्यक्रम समन्वयक सदस्य नरेंद्र चहांदे, विभागीय संघटक आकाश चौरे, कोषाध्यक्ष अरविंद धारगावे, यांची सुद्धा नियुक्ती यावेळी करण्यात आली आहे. सभेचे संचालन डी. डी. गजभिये, प्रास्ताविक राजेश दहिवले, यांनी केले असून आभार रवी शेंडे यांनी व्यक्त केले. सभेला नागपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली, वर्धा जिल्हाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महत्वाचे

### जगतगुरु संत तुकाराम महाराज पुण्यतिथी सोहळा



**नागपूर :** जगतगुरु संत तुकाराम महाराज स्मारक समितीद्वारा संत तुकाराम महाराज स्मृतीदिन संत तुकाराम महाराज स्मारक, संत तुकाराम महाराज चौक आशीर्वादनगर, येथे साजरी केली. यावेळी राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे सचिव प्रा. शरद वानखेडे, नगरसेवक शकील पटेल, दीपक कापसे, महेश बांते, दिलीप राऊत, किशोर गिद, सिद्धू कोमेजवार, सतीश बिहारे, बाजीराव राकास, संजय शिंदे, रमेश सावरकर, अमित कातुरे, दीपक आवळे, गुणवंता मुळे, ॲड. नुपूर मते, जेष्ठ नागरीक मंडळचे शेंदरे आणि इतर सदस्य व मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. परमेश्वर राऊत यांनी संत तुकाराम महाराजांना अभिवादन केली. शरद वानखेडे, दिपक कापसे, शकील पटेल यांनी संत तुकाराम महाराजांच्या व्यक्तीमत्वाचे विविध पैलू सांगितले. आभार प्रवीण विघरे यांनी मानले.

### रणजीत मेश्राम यांना बसपा तर्फे शोक संवेदना



**नागपूर :** बामसेफचे संस्थापक कांशीरामजी यांनी 1973 ला घेतलेल्या बामसेफच्या नागसेन हायस्कूल मधील बैठकीचे रिपोर्टिंग रणजीत मेश्राम यांनी पत्रकार म्हणून केले होते. देशात आंबेडकरवाद रुजवून बहुजन समाज बनविण्याची प्रक्रिया कांशीरामजींनी सुरू केली या मताचे प्रा. रणजीत मेश्राम होते. प्रा. रणजीत मेश्राम हे आंबेडकरी चळवळीतील प्रसिद्ध पत्रकार, लेखक व प्रवक्ते होते. त्यांच्या अकाली निधनाने बहुजन चळवळीची हानी झाली, असे उद्गार बहुजन समाज पार्टीचे महाराष्ट्र प्रदेश मीडिया प्रभारी उत्तम शेवडे यांनी त्यांच्या शोक संवेदना व्यक्त करताना काढले.

## तथागत बुद्ध विहार,काशीनगर येथे धम्मसंगोष्टी यशस्वी



**नागपूर :** फाल्गुनी पौर्णिमा निमित्त राष्ट्रीय बौद्ध महासभा, राष्ट्रीय परिवरिक धम्म संगोष्टी, भारतीय बौद्ध महासभा आणि तथागत बुद्ध विहार, काशिनगर, डॉ. बाबासाहेब शताब्दी चौक, नागपूर येथे तसेच इतर विहारामध्ये धम्म संगोष्टीचे आयोजन केले होते. संघोष्टीमध्ये बौद्धांनी काय करू नये, काय करावे, याबाबत बुद्धाच्या जीवनापासून तर डॉ. बाबासाहेबांनी दिलेल्या धम्म दीक्षेपर्यंत सर्व इतिहास सांगण्यात आला. बौद्धांची संस्कृती निर्माण करायची असेल तर सण उत्सवाची निर्मिती, संस्कार निर्मिती करणे गरजेचे आहेत. वर्णा प्रमाणे जे सण व संस्कार निर्माण करून सामान्य लोकांचे मेंदू काबीज करण्यात आले, त्यामुळे लोक अंधश्रद्धा, भीती पोटी विचार न करता साजरे करतात. ते त्यांनी करू नये यासाठी डॉ. बाबासाहेबांनी बौद्ध धम्म दिला. जो विज्ञानवादी, तर्कवादी, बुद्धिवादी व न्यायावर आधारित समता, स्वातंत्रता, बंधुता, न्याय या मूल्यांची स्थापना व अंगीकरण्यासाठी दिला. म्हणून आपण सर्व बौद्धांनी कोणतेही हिंदू धर्माप्रमाणे असलेले सण किंवा संस्कार करू नये. तर ते बौद्ध संस्कारप्रमाणे करावे असे अनेक इतिहासाचे पुरावे डॉ. बाबासाहेबांचे भाषणाचे संदर्भ देऊन गुलचंद बौद्ध यांनी सांगितले. या सांगोष्टीमध्ये सर्व उपासक आणि उपासिका पांढऱ्या गणवेशमध्ये उपस्थित होते. तसेच श्रीराम बनसोड यांनी सुद्धा आपले विचार मांडले. बनसोड यांनी आपल्या बालवयापासून मनातील भीती कशी नाहीसी झाली याचे ज्वलंत उदाहरण देवून पुढे शिक्षण पूर्ण करून अधिकारी पदापर्यंत केलेल्या वाटचालीत शील किती प्रभावी असते हे सांगितले. आणि धम्माचे आचरण करावे असे आवाहन केले. प्रशांत मुंद्रे यांनी धम्म संगोष्टीच्या शिबिरावर आपल्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या. कार्यक्रमाचे संचालन, प्रास्ताविक व पाहुण्याचा परिचय सुधाकर स्थूल यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी कर्णबोधि मांडवे, सिंधू स्थूल, कुमुद गाणार, ईश्वर कडबे, दिलीप ताकसांडे, जया ढेंगरे, चंद्रकला रामटेके, विजय तागडे, संघर्ष नागदेवते, दिपाली कांबळे, माला नरांजे इत्यादींनी केले. आभार नानाजी ढेंगरे यांनी मानले. अखेर धम्म गाथाचे पठण करून सांगोष्टीचे समापरोप केला.

## धम्मसंगोष्टीच्या सभेत हृदयविकार व जीवन शैलीवर चर्चा



**नागपूर :** निसर्गाने माणसाला एकच हृदय दिले आहे, दुसऱ्या हृदयाची सोय केली नाही. त्यामुळे प्रत्येकांनी आपल्या हृदयाला जपणे हाच एकमेव मार्ग आहे. आज अनेकांच्या जीवनात आणि तरुण वयात सुद्धा हृदय विकारासंबंधीत समस्या वाढल्या आहेत. साधारणपणे आनुवंशिकता, बदलती जीवनशैली, खानपान, व्यायामाचा अभाव, अपूर्ण झोप, धूम्रपान, मद्यपान, दैनंदिन जीवनातील अनावश्यक तणाव या प्रकारच्या विविध कारणामुळे हृदयविकाराचे प्रमाण वाढले आहेत असे गुरुवारच्या 384 व्या धम्मसंगोष्टी सभेत 'हृदय विकाराच्या समस्या आणि जीवनशैली' यावर वरिष्ठ हृदयरोग तज्ञ, न्यू लाईफ हॉस्पिटल, बेसाचे संचालक डॉ. राम घोडेस्वार यांनी विचार व्यक्त केले. सकारात्मक विचार, नियमित व्यायाम, संगीत, जीवनशैलीत सकारात्मक बदल, डॉक्टरच्या नियमित तपासणी-चाचण्या, डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार औषधी घेतल्यास हृदयाच्या संबंधित समस्या बऱ्याच प्रमाणात दूर करता येतात असेही डॉ. घोडेस्वार म्हणाले. सभासदांनी हृदय विकारा संबंधीत विचारलेल्या प्रश्नांचे आणि शंकाचे डॉ. घोडेस्वार यांनी सोप्या भाषेत निरसन केले. जे जीवनशैलीचे नियम पाळतात, ते स्वस्थ राहतात. तथागत बुद्धाने 2500 वर्षापूर्वी निरोगी शरीर आणि मन कसे ठेवावे याबद्दल उपदेश दिलेले आहेत. बुद्धांनी सांगितल्याप्रमाणे वर्तमानात जगता आले पाहिजे, सामुदायिक जीवनात असलेला आनंद घेता आला पाहिजे. त्यासाठी अष्टांगिक मार्गाचे पालन केले पाहिजे असे सभाध्यक्ष प्रा. घनश्याम धाबर्डे यांनी सदर विषयावर विचार व्यक्त केले. कार्यक्रमाच्या सुरूवातीस राजकीय चिंतक, निर्भीड पत्रकार रणजीतदादा मेश्राम यांच्या दुःखद निधनामुळे त्यांना आदरांजली अर्पण करण्यात आली. कार्यक्रमाचे संचालन रेखा नाईक, धम्मगीत अन्नपूर्णा दुपटे आणि आभार खेमचंद भागवतकर यांनी व्यक्त केले. सभेच्या अल्पोपहाराची व्यवस्था अभिमान महिला अर्बन क्रेडिट को. सो. चे संचालक विरेंद्र मेश्राम यांनी केली. सभेला अनेक गणमान्य व्यक्ती उपस्थित होते. धम्मपालन गाथेने धम्मसंगोष्टीची सांगता करण्यात आली.

### आलेबेदर येथे दोन दिवसीय बौद्ध धम्म परिषद



**नागपूर :** दोन दिवसीय बौद्ध धम्म परिषद आलेबेदर येथील कार्यक्रमात समता सैनिक दलाचे शिबिर आयोजित केले होते, या शिबिराचे उद्घाटन समता सैनिक दलाचे राष्ट्रीय सल्लागार भदंत नागदिपंकर महाथेरो यांच्या हस्ते झाले असून या कार्यक्रमात गजेन्द्र गजभिये - ट्रेनिंग चिफ, कैलास गेडाम - जिल्हा कमांडर, रोशन फुले - लाखांदूर तालुका प्रमुख, चिरंजीव बारसागडे - साकोली तालुका प्रमुख, स्वप्नील गणवीर - जिल्हा ट्रेनिंग अधिकारी, विलास मेश्राम, दादू बडोले, धनपाल गडपायले, विलास नागदेवे, गवरे सर, अचल मेश्राम, आणि समता सैनिक दलाचे सैनिक यांच्या समवेत ध्वज फडकवण्यात आले. समता सैनिक दलाचे सर्व सैनिक या दोन दिवसीय बौद्ध धम्म परिषदेच्या सुरक्षा व्यवस्थेचे कार्य करणार आहेत.

## प्रा. रंजना कवाडे यांच्या कुटुंबियांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतली सांत्वना भेट



**नागपूर :** आंबेडकरवादी चळवळीतील ज्येष्ठ मार्गदर्शक आणि शांत, संयमी व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखल्या जाणाऱ्या प्रा. रंजना कवाडे यांच्या निधनानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कवाडे कुटुंबीयांची भेट घेत त्यांना सांत्वन केले. नागपुरातील लक्ष्मीनगर येथील त्यांच्या निवासस्थानी जाऊन मुख्यमंत्र्यांनी रंजना यांच्या स्मृतींना आदरांजली अर्पण केली आणि कुटुंबीयांशी संवाद साधत त्यांना धीर दिला. प्रा. रंजना कवाडे यांचे गेल्या महिन्यात नागपुरात दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनाने आंबेडकरवादी चळवळ तसेच सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात शोककळा पसरली आहे. त्या लॉंग मार्चचे प्रणेते, पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे (पीरिपा) राष्ट्रीय अध्यक्ष आणि माजी खासदार प्रा. जोगेंद्र कवाडे यांच्या पत्नी होत्या. तसेच पीरिपाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष व महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाचे उपाध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) जयदीप कवाडे यांना मातृशोक झाला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रंजना कवाडे यांच्या कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख करताना सांगितले की, त्यांनी आयुष्यभर आंबेडकरवादी विचारसरणीशी निष्ठा राखत समाजकार्य केले. त्यांच्या शांत आणि संयमी स्वभावामुळे अनेक कार्यकर्त्यांना प्रेरणा व मार्गदर्शन मिळाले. सामाजिक चळवळीतील त्यांच्या योगदानाची आठवण नेहमीच राहील, असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नमूद केले. यावेळी नागपूरचे जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, कवाडे कुटुंबातील सुन प्रतिमा जयदीप कवाडे, नात नीरजा कवाडे, अस्मिता कवाडे, पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे महाराष्ट्र प्रदेश संघटक कपिल लिंगायत, विदर्भ अध्यक्ष विजय पाटील, नागपूर शहर अध्यक्ष कैलाश बोम्बले, नागपूर शहर कार्याध्यक्ष संजय सूर्यवंशी, नागपुर युवक आघाडी जिल्हाअध्यक्ष पलाश ठवरे, दक्षिण-पश्चिम विधानसभा अध्यक्ष स्वप्निल महल्ले, दक्षिण नागपूर विधानसभा अध्यक्ष प्रजोत कांबळे, दक्षिण पश्चिम विधानसभा कार्याध्यक्ष श्रेयस गाडलिंगे, साहिल ठवरे, प्रवेश ठवरे यांच्यासह भीमसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रमाई आंबेडकरनगर जयताळा येथे दहा दिवसीय शिबीराची सांगता



**नागपूर :** आना पानासती, प्राणायाम, ध्यान साधना या दहा दिवसीय शिबिर उत्साहात झाले. या शिबिरात सहभागी झालेल्या महिला व पुरुषांचे असंख्य आजार दूर झाले. बीपी, शुगर, ॲसिडिटी, मायग्रेन, शरीरातील दुखणे, चक्कर येणे, हातापायाची बोटे वाकडी होणे, जमिनीवर बसता न येणे, पोटाचे आजार, अशा अनेक आजार या आनापान सती, ध्यान साधनेच्या माध्यमातून दूर झाल्या असे शिबिरात सहभागी झालेल्या महिला पुरुषांनी आपापले अनुभव सांगितले.हे दहा दिवशीय शिबिर रमाई आंबेडकरनगर जयताळा नागपूर येथे झाले असून या शिबिराचे प्रशिक्षक प्रकाश बनसोड हे होते. या शिबिरामध्ये अनेक महिला व पुरुषांनी भाग घेतला होता आणि नामदेवराव शेवाळे, गिरीश गजभिये, संजय गजघाटे, वाघमारे, विलास खोब्रागडे, गोकुळा अटंबर, गौरा आवडे, कांता खोब्रागडे, थूलकर, सुरेंद्र आवळे, अटंबर पाटील, वनकर, चवरे, बनकर, शेवाळे, यांच्या प्रयत्नांनी हे शिबिर यशस्वी झाले.

## जर्नी इन पॉवर प्रोजेक्ट ट्रांसफार्मेटिव्ह लेसन पुस्तकाचे प्रकाशन




**नागपूर :** निवृत्त अभियंता मित्र मंडळ (NAMM) च्या मासिक बैठकीत इन्स्टिट्युशन ऑफ इंजिनिअर्सच्या सभागृहात 'जर्नी इन पॉवर प्रोजेक्ट ट्रांसफार्मेटिव्ह लेसन' या विषयावरील पुस्तकाचे प्रकाशन केले. महाजनकोचे सेवानिवृत्त इंजि. गजानन एम. तुळणकर, इंजि. अनंत जी. देवतारे व इंजि. अरुण वाय. घुशे यांनी हे पुस्तक लिहीले आहे. पुस्तकाचे प्रकाशन इंजि. अनिल पालमवार सेवानिवृत्त संचालक, महावितरण, इंजि. प्रकाश कुळकर्णी, तांत्रिक संचालक, म.रा.वि.मं. व डॉ. संदिप शिरखेडकर, विद्यमान अध्यक्ष, आय.ई.आय., नागपूर यांचे हस्ते झाले. या पुस्तकात लेखकांद्वारे स्थापत्य अभियंत्यांना प्रकल्पाच्या कामात आलेल्या अडचणींवर मात कशी करायची हे अनुभवावर आधारीत निरीक्षण मांडण्यात आले आहे. हे पुस्तक सिविल इंजिनिअर्स सह वीज उत्पादन योजनेत काम करणाऱ्यांसाठी व नवीन पिढीसाठी मार्गदर्शक राहील. या कार्यक्रमाचे संचालन इंजि. विलास अलकारी (NAMM) यांनी तर इंजि. यादव लक्षणे यांनी आभार प्रदर्शन केले. या कार्यक्रमाला वरीष्ठ इंजिनिअर्स, NAMMचे सभासद, महाजेनकोचे इंजिनिअर्स तसेच मित्र व आप्त परिवार उपस्थित होते.

### आवळे बांबू यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आयोजित परिसंवादाचा कार्यक्रम 7 ऐवजी 15 मार्चला




**नागपूर :** कर्मवीर हरिदास आवळे बाबू प्रतिष्ठानची तातडीची सभा विनायकराव जामगडे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. कर्मवीर हरिदास आवळे बाबू प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष प्रसिद्ध आंबेडकरी तत्वज्ञानाचे विश्लेषक पत्रकार प्रा. रणजित मेश्राम यांच्या निधनाबद्दल शोक प्रस्ताव पारित करण्यात आला. सभेत डॉ. पुरण मेश्राम, पुरूषोत्तम गायकवाड, हरिश जानोरकर, के.एम. उके, अतुल वंजारी यांनी शोक संवेदना व्यक्त केल्या. कर्मवीर हरिदास आवळे बाबू यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आयोजित परिसंवादाचा कार्यक्रम दि. 7/3/2026 कार्यक्रम स्थगित करून दि. 15/3/2026 ला डॉ. आंबेडकर मिशन मुकूंदराव आंबेडकर चौक, लष्करीबाग, नागपूर येथे दुपारी 2.30वाजता होईल. तरी यांची नोंद घ्यावी.

बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एम.आय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. RNI No. MAHMAR 2020/84035 Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648